PC 5 D:/Regular-17/roshan new shelar/Circular (Pra)

# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2023-24)/10/ of 2023**

## परिपत्रक:

**विषय: अकृषि विद्यापीठे व संलग्नित अनुदानित महाविद्यालयांमधील कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत...**

संदर्भ: शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण २०१६/(२६२/१६)/विशि—१
दि. ३१ मे, २०२३

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थांचे संचालक यांना कळविण्यात येते की, वित्त विभागाच्या दि. १.४.२०१० व दि. ५.७.२०१० च्या शासन निर्णयान्वये अनुक्रमे पदोन्नतीची संधी उपलब्ध असलेल्या व एकाकी पदावरील राज्य शासकीय कर्मचारी व जिल्हा परिषद यामधील कर्मचारी यांना यापूर्वी कार्यान्वित असलेली सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना सुधारित करून "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना" या नावाने लागू करण्यात आली.

०२. वित्त विभागाच्या वरील दि. १.४.२०१० व दि. ५.७.२०१० च्या शासन निर्णयातील ''सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना'' यासंदर्भातील तरतुदी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अनुक्रम दि. १५.२.२०११ व दि. २८.१२.२०१० च्या शासन निर्णयान्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांना लागू केल्या. अशा तरतुदी लागू केल्यमुळे वित्तीय भारामध्ये वाढ होणार असल्यामुळे त्यास वित्त विभागाची पूर्व मान्यता आवश्यक होती. तथापि, त्यासाठी वित्त विभागाची मान्यता प्राप्त करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आली. त्यामुळे अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांना लागू करण्यात आलेली ''सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना'' उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अनुक्रम दि. ७.१२.२०१८ व दि. १६.२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आली.

०३. ''सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना'' पूर्ववत लागू करावी या मागणीसाठी विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचारी यांनी न्यायालयांमध्ये याचिका दाखल केल्या होत्या. याचिका क्र. ५३६३/२०२१ (श्री. मेघराज पंडीत व इतर विरूध्द महाराष्ट्र शासन) तसेच अन्य समान विषयांच्या याचिकांमध्ये मा. न्यायालयांनी दिलेल आदेश, विधि व न्याय विभाग आणि वित्त विभागाचे अभिप्राय विचारात घेऊन ''सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना'' बाबत यापूर्वी निर्गमित करण्यात

आलेल्या आदेशांसंदर्भात करावयाची कार्यपध्दती विहित करण्यायाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून दि. २५.८.२०२२ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता.

०४. ''सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना'' पूर्ववत लागू करावी या व अन्य मागण्यांसाठी फेब्रुवारी, २०२३ या महिन्यामध्ये विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचारी यांनी आंदोलन केले होते. सदर मागण्यांसंदर्भात दिनांक १५.२.२०२३ रोजी मा. उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीतील निर्णयानुसार अकृषि विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित अनुदानित महाविद्यालयांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ''सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना'' करण्यात आली आहे.

तरी सोबत जोडलेल्या मार्गदर्शक पत्राच्या अनुषंगाने सर्व महाविद्यालयांनी सोबत जोडलेल्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करावी. (प्रत संलग्न).

उपरोक्त बाबतीत मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांला विनंती करण्यात येते की, संदर्भाधीन परिपत्रकातील सूचनांचे पालन करण्यात यावे.

(प्रा. सुनिल भिरुड)
प्रभारी कुलसचिव

मुंबई —४०० ०३२
9 जुन, २०२३

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमुख आणि संचालक.

# Fwd: CR-262-16 विषय:-राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे व संलग्नित अनुदानित महाविद्यालयांमधील कर्मचाऱ्यांना सुंधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती प्रगती योजना लागू करण्याबाबत.

1 message

**Registrar** <registrar@fort.mu.ac.in> Sat, Jun 3, 2023 at 11:36 AM
To: "Deputy Registrar, Establishment" <dr.estab@fort.mu.ac.in>, Affiliation Unit 2 Fort <ar.affiliation2@fort.mu.ac.in>, DR AFFILIATION <dr.affiliation@fort.mu.ac.in>

**Prof. Sunil Bhirud**
**I/c. Registrar,**
**University of Mumbai**
**Fort MUMBAI 400032**
**Ph. office . 022 68320000 Ext. 706**

---------- Forwarded message ---------
From: **DHIRAJKANTILAL** <vishi1-hted@mah.gov.in>
Date: Fri, Jun 2, 2023 at 5:14 PM
Subject: CR-262-16 विषय:-राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे व संलग्नित अनुदानित महाविद्यालयांमधील कर्मचाऱ्यांना सुंधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती प्रगती योजना लागू करण्याबाबत.
To: <registrar@fort.mu.ac.in>, <regis@unipune.ernet.in>, <regis@unipune.ac.in>, <registrar@unishivaji.ac.in>, <registrar@sndt.ac.in>, <registrar@nmu.ac.in>, <bbpatil@nmu.ac.in>, <sgc.ycmou@gmail.com>, <registrar@ycmou-digitaluniversity.ac>, <registrar@bamu.ac.in>, <srtmunregistrar@gmail.com>, <registrar@sus.ac.in>, <reg@sgbau.ac.in>, <patoregistrar@sgbac.ac.in>, <kksuregistrar1997@gmail.com>, Raju E Hiwase <registrar@nagpuruniversity.nic.in>, <registrar.gondwanauniversity@gmail.com>

**Subject:** राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे व संलग्नित अनुदानित महाविद्यालयांमधील कर्मचाऱ्यांना सुंधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती प्रगती योजना लागू करण्याबाबत.

Please see attached copy herewith.

**202305312017474608.pdf**
148K

अकृषि विद्यापीठे व संलग्नित अनुदानित महाविद्यालयांमधील कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण २०१६/(२६२/१६)/विशि-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- ३१ मे, २०२३.

वाचा:-

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वेतन-११०९/प्र.क्र. ४४/सेवा-३ दिनांक १ एप्रिल,२०१०.
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वेतन-११०९/प्र.क्र. ४१/सेवा-३ दिनांक ५ जुलै,२०१०.
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१०/(४८८/१०)/ विशि-१ दिनांक २८ डिसेंबर,२०१०.
४) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१०/(४८८/१०)/ विशि-१ दिनांक १५ फेब्रुवारी,२०११.
५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/(२६२/१६)/ विशि-१ दिनांक ७ डिसेंबर,२०१८.
६) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/(२६२/१६)/ विशि-१ दिनांक १६ फेब्रुवारी,२०१९.
७) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/(२६२/१६)/विशि-१ दिनांक २५ ऑगस्ट, २०२२.
८) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्रमांक बैठक-२३०२/प्र.क्र. ३६/ विशि-१ दिनांक १७ फेब्रुवारी,२०२३.

प्रस्तावना:-

वित्त विभागाच्या दि.१.४.२०१० व दि.५.७.२०१० च्या शासन निर्णयांन्वये अनुक्रमे पदोन्नतीची संधी उपलब्ध असलेल्या व एकाकी पदावरील राज्य शासकीय कर्मचारी व जिल्हा परिषद यामधील कर्मचारी यांना यापूर्वी कार्यान्वित असलेली सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना सुधारित करून "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना" या नावाने लागू करण्यात आली.

०२. वित्त विभागाच्या वरील दि.१.४.२०१० व दि.५.७.२०१० च्या शासन निर्णयातील "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना" यासंदर्भातील तरतुदी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अनुक्रमे दि.१५.२.२०११ व दि.२८.१२.२०१० च्या शासन निर्णयान्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांना लागू केल्या. अशा तरतुदी लागू केल्यामुळे वित्तीय भारामध्ये वाढ होणार असल्यामुळे त्यास वित्त विभागाची पूर्व मान्यता आवश्यक होती. तथापि, त्यासाठी वित्त विभागाची मान्यता प्राप्त करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आली. त्यामुळे अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांना लागू करण्यात आलेली "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना" उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.७.१२.२०१८ व दि.१६.२.२०१९ च्या शासन निर्णयांन्वये रद्द करण्यात आली.

०३. "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना" पूर्ववत लागू करावी या मागणीसाठी विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचारी यांनी न्यायालयांमध्ये याचिका दाखल केल्या होत्या. याचिका क्र.५३६३/२०२१ (श्री.मेघराज पंडीत व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन) तसेच अन्य समान विषयांच्या याचिकांमध्ये मा.न्यायालयांनी दिलेले आदेश, विधि व न्याय विभाग आणि वित्त विभागाचे अभिप्राय विचारात घेऊन "सुधारित सेवांतर्गत आश्वासित

प्रगती योजना" बाबत यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांसंदर्भात करावयाची कार्यपध्दती विहित करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून दि.२५.८.२०२२ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता.

०४. "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना" पूर्ववत लागू करावी या व अन्य मागण्यांसाठी फेब्रुवारी,२०२३ या महिन्यामध्ये विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचारी यांनी आंदोलन केले होते. सदर मागण्यांसंदर्भात दिनांक दि.१५.२.२०२३ रोजी मा. उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीतील निर्णयानुसार अकृषि विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नीत अनुदानित महाविद्यालयांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना" पूर्ववत लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यासंदर्भात पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे:-

**शासन निर्णय:-**

(१) अकृषि विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नीत अनुदानित महाविद्यालयांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना" रद्द करण्यासंदर्भातील दिनांक दि.७.१२.२०१८, दि.१६.२.२०१९ व दि.२५.८.२०२२ चे शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहेत.

(२) शासन निर्णय दि.७.१२.२०१८ व दि.१६.२.२०१९ निर्गमित होईपर्यंत ज्या कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार लाभ देण्यात आले आहेत ते कायम ठेवून त्याप्रमाणे सातव्या वेतन आयोगाची वेतननिश्चिती करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

(३) शासन निर्णय दि.२८.१२.२०१० व दि.१५.२.२०११ अन्वये लागू करण्यात आलेली सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना पूर्ववत चालू ठेवण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

(४) सदर योजना पूर्ववत चालू ठेवण्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु.३८ कोटी एवढ्या वार्षिक आवर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

०२. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक १८४/२३/सेवा-३ दिनांक २५ एप्रिल, २०२३ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

०३. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२३०५३१२०१७४७४६०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT MADHUKARRAO BAWISKAR

Digitally signed by AJIT MADHUKARRAO BAWISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=deb455609479b6c7f30e7f1f9a8360c0f8600a542859e8fe229d6ea333415e8d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=99EB928028DF71EBDFCD2898E209D499192AD3899261FEAD42F7D38A3141AB69, cn=AJIT MADHUKARRAO BAWISKAR
Date: 2023.05.31 20:18:23 +05'30'

**( अजित बाविस्कर )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, मलबार हिल, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.मंत्री,उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७) मा.विरोधीपक्ष नेता, विधान परिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
८) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

९) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०) महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
११) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञयेता), महाराष्ट्र, मुंबई.
१२) महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१४) कुलगुरू, सर्व अकृषि विद्यापीठे,
१५) कुलगुरू, सर्व अभिमत विद्यापीठे,
१६) उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१७) तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१८) कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
२०) सर्व विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण,
२१) कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
२२) कुलसचिव, सर्व अभिमत विद्यापीठे,
२३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२४) उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व कार्यासने
२५) श्री. अजय ब. देशमुख, प्रमुख संघटक, म. रा. विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती.
२६) श्री. आर. बी.सिंह, प्रमुख सल्लागार, म. रा. विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती.
२७) श्री. मिलिंद प्र. भोसले, मुख्य संघटक, म. रा. विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती.
२८) श्री. दिपक मोरे, संघटक, म. रा. विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती.
२९) श्री. रा.जा. बढे, मुख्य संघटक, म. रा. विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती.
३०) श्री. रावसाहेब त्रिभुवन, मुख्य संघटक, म. रा. विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती.
३१) श्री. आनंदराव खामकर, मुख्य संघटक, म. रा. विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती.
३२) श्री. प्रकाश म्हसे, मुख्य संघटक, म. रा. विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती.
३३) श्री. सुनिल धिवर, मुख्य संघटक, म. रा. विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती.
३४) निवड नस्ती (विशि-१).